## अर्ज निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१/तहसीलदार यांनी संचिका क्र.२०२१/जमा–२/कावि–१४३ दि.१७/०५/२०२२ अन्वये वादांकीत रस्त्याबाबत पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करण्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश–३९, नियम–१ व २ अन्वये तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी प्रस्तुत अर्जात वादींतर्फे केली आहे.

०२. मूळ दाव्यात मौजे पुरुषोत्तमपुरी, ता. माजलगाव, जि. बीड येथील प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे जमीन सर्व्हे क्र.११ तथा गट क्र.२० मधील जमीन व इतर शेतकऱ्यांना त्यांचे जमिनीचे वहीवाटीसाठी जायकवाडी सरकारी रस्त्यापासून वादीच्या जमीन सर्व्हे क्र.१० तथा गट क्र.१७ चे पूर्व बाजूने दक्षिणोत्तर बांधावरुन प्रचलीत असलेला सव्वा आठ फुटाचा रस्ता खुला करुन देण्याबाबत उपरोक्त प्रकरणातील महाराष्ट्र जमीन महसूल संहीता, १९६६ कलम १४३ (यानंतर संक्षिप्तपणे **"सदर संहीता"** असे संबोधण्यात येते.) अन्वये प्रतिवादी क्र.१ मार्फत पारीत आदेश हा वादविषय आहे. वादींतर्फे प्रस्तुत मूळ प्रकरणात सदर आदेश रद्द करण्याच्या हुकूमनाम्याची मागणी केली आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ व ३ हे आपसांत सख्खे भाऊ आहेत, प्रतिवादी क्र.४ व ५ हे त्यांचे सख्खे चुलत भाऊ आहेत आणि प्रतिवादी क्र.७, ८ व ९ हे प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या मयत भावाचे अनुक्रमे दोन मुले व पत्नी आहेत. त्यांच्या पूर्वजांना जमीन सर्व्हे क्र.११ मध्ये एकूण १५ एकर शेत जमीन होती. जमीन सर्व्हे क्र.११ यास कालांतराने गट क्र.१८, १९ व २० असे पडले. प्रतिवादी क्र.५ याने गट क्र.१५ मध्ये ०४ एकर ३० गुंठे जमीन घेतली, जी वादी क्र.१ च्या जमीन गट क्र.१६ चे पश्चिमेस आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या सर्व्हे क्र.११ मधील जमीन क्षेत्र वादी क्र.१ च्या जमीन सर्व्हे क्र.१० च्या उत्तर बाजूस आहे.

तसेच, जमीन सर्व्हे क्र.११ मध्ये जाण्या येण्यासाठी वादी क्र.१ चा जमीन गट क्र.१५ व १६ च्या बांधावरुन दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यावर पुढे काही अंतराने पूर्णपणे वादीच्या असलेल्या जमीन गट क्र.१६ च्या बांधावरुन १० ते १२ फुटाचा रस्ता मागील ७० ते ८० वर्षांपासून होता व आजही अस्तीत्वात आहे. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या आपसात वाटण्या झाल्या आणि प्रतिवादी क्र.२ व ३ यांना गट क्र.२० मध्ये ५ एकर जमीन मिळाली. गट क्र.२० च्या पश्चिम बाजूस असलेल्या गट क्र.१९ मध्ये प्रतिवादी क्र.५ आणि त्या जमिनीच्या पश्चिम बाजूस असलेल्या गट क्र.११ पैकी प्रतिवादी क्र.४ यास वाटणीमध्ये हिस्से मिळाले. प्रतिवादी क्र.५ ने प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या हिश्श्यातून व पूर्वापार असलेल्या उपरोक्त रस्त्यातून येण्यास मनाई केली. त्यावरुन, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ कडे रस्त्यासंबंधाने अर्ज केला. प्रतिवादी क्र.१ यांनी मंडळ अधिकारी, किट्टी आडगाव मार्फत जायमोक्यावर पंचनामा करुन अहवाल मागवून घेतला. तथापि, सदर पंचनामा वादींच्या उपरोक्ष केला.

**०३.** वादकथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ मार्फत सदर अहवाल, वादीं व प्रतिवादी क्र.२ ते ९ यांचे म्हणणे ऐकल्यानंतर वादांकीत रस्त्याबाबतचा उपरोक्त आदेश पारीत करुन त्या रस्त्याबाबत वादीं व इतर शेतकऱ्यांविरूद्ध प्रतिबंधीत आदेश जारी केले. प्रतिवादी क्र.१ मार्फत त्या भागातील शेत जमिनींची भौगोलिक परिस्थीती, उपरोक्त पर्यायी रस्ता व अन्य बाबींची पडताळणी न करताच वादांकीत रस्त्याचा आदेश अवैधरित्या पारीत केला आहे. वादीं क्र.१ व प्रतिवादी क्र.२ दरम्यान राजकीय वैमनस्य आहे. सदर परिसरातील शेतजमीन खोल काळ्या मातीच्या असल्यामुळे पावसाळयात पाण्याने माती वाहून जाण्याची शक्यता आहे. त्याकरिता, वादींनी त्यांच्या जमिनीचे सपाटीकरण व बांधबंधीस्ती केली आहे. इतर शेतकऱ्यांना जमिनीमध्ये जाण्या येण्यासाठी सोय होण्याच्या उद्देशाने वादी क्र.१ ने देखील स्वतःच्या जमिनीवरील बांधावरुन वर नमूद पर्यायी रस्ता दिला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे जमीन गट क्र.२० मधील क्षेत्र हे वादीच्या जमीन

गट क्र.१७ पेक्षा १० ते १५ फुट खाली आहे. तर, वादी क्र.२ ची जमीन वादी क्र.१ च्या जमिनीपेक्षा खाली आहे. करिता, वादांकीत आदेशान्वये रस्ता करणे अशक्य आहे. तथापि, सदर भौगोलिक परिस्थीतीचा उपरोक्त पंचनाम्यामध्ये जाणीवपूर्वक उल्लेख केला नाही. मंडळ अधिकारी, किट्टी आडगाव यांनी केलेल्या पंचनामा व अहवालामध्ये उपरोक्त पूर्वापार रस्त्याचा उल्लेख केला आहे. सदर पर्यायी रस्त्याचा वापर करु देण्यास सर्व संबंधीत शेतकरी सकारात्मक आहेत. वादांकीत आदेश सदर संहीतेचे कलम १४३ च्या कक्षेत येत नाही. करिता, वादींना प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले. त्यांचे हक्कात प्रथम दर्शनी पुरावा असून, सोयीचा समतोल सुद्धा त्यांच्याच बाजूने आहे. मागणीप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मंजूर न केल्यास, त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. करिता, वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

**०४.** प्रतिवादी क्र.१, २ व ३ मार्फत मूळ दावा व प्रस्तुत अर्जावर लेखी कैफीयत तथा म्हणणे अनुक्रमे नि.क्र. ४१, ४२ व ८७ वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.३ मार्फत पुरसीस नि.क्र.८८ अन्वये त्याचेतर्फे दाखल कैफीयत नि.क्र.८७ मधील मजकूर, या अर्जावरील म्हणणे म्हणून ग्राह्य धरावा असे सुद्धा कळविले. त्याआधारे, प्रस्तुत प्रतिवादींनी वादपत्रातील वादांकीत रस्त्याच्या आदेशाबाबत आणि पर्यायी रस्ता अस्तीत्वात असल्याचे कथन नाकारुन, प्रतिवादी क्र.१ मार्फत पारीत केलेला वादांकीत रस्त्याबाबतचा आदेश कायदेशीररित्या योग्य व ग्राह्य असल्याचे नमूद केले. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या अधीकच्या कथनाप्रमाणे, त्यांना व त्यांचे कुटुंबियांना त्यांची जमीन गट क्र.२० मध्ये असलेल्या क्षेत्रामध्ये येण्या जाण्यासाठी कायमस्वरुपी रस्ता अस्तीत्वात नाही आणि त्यामुळे त्यांच्या शेतपिकाचे नुकसान होत आहे. वादींतर्फे मूळ दावा व प्रस्तुत अर्ज खोट्या सबबीआधारे दाखल केला आहे. वादीं स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आले नाहीत. करिता, प्रस्तुत प्रतिवादींनी मूळ दावा व प्रस्तुत अर्ज खर्चासह रद्द करण्याची मागणी केली आहे.

**०५.** प्रतिवादी क्र.५ तर्फे कैफीयत नि.क्र.७० अन्वये वादकथन नाकारुन प्रतिवादी क्र.१ मार्फत पारीत वादांकीत रस्त्याचा आदेश कायदेशीररित्या ग्राहय नसल्याने नमूद करुन, तो कायम ठेवण्याची मागणी केली. या प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, जमीन सर्व्हे क्र.११ संबंधाने प्रतिवादी क्र.१ ने मंजूर केलेल्या रस्त्याशिवाय इतर कोणत्याही स्वरुपाचा दुसरा पर्यायी मार्ग उपलब्ध नाही.

**०६.** प्रतिवादी क्र.५ व ६ मार्फत अनुक्रमे नि.क्र.१२८ व १२९ अन्वये त्यांचे मालकी व ताब्यातील जमीन गट क्र.१९ व १८ मधून प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांना त्यांच्या मालकीच्या जमीन गट क्र.२० मध्ये येण्याजाण्यास तसेच शेती कामासाठी रस्ता करण्यास संमती असल्याने आणि भविष्यात त्यांच्यातर्फे त्याबाबत आक्षेप अथवा उजर राहणार नसल्याचे कळविले.

**०७.** वादींचे विधीज्ञ श्री. बी. आर. डक, प्रतिवादी क्र.१ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. एन. मस्कर आणि यांचा प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. जोशी यांचा प्रदीर्घ युक्तीवाद ऐकला. त्यांनी युक्तीवादा दरम्यान, आपआपल्या पक्षकारांतर्फे वर नमूद कथनानुसार केलेले मुद्दे उपस्थित करुन माझे प्रकरणात दाखल कागदपत्रांकडे लक्ष वेधले. तत्पूर्वी, प्रतिवादी क्र.२ तर्फे अर्ज नि.क्र.१३४ वरील दि.१२.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद करण्यास्तव पूर्व परवानगी घेतली.

**०८.** वादींच्या विधीज्ञांनी केलेल्या अधीकच्या युक्तीवादाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ मार्फत पारीत वादांकीत रस्त्याबाबतचा आदेश सदर संहीताचे कलम १४३ मधील तरतूदींन्वये कायदेशीर रित्या ग्राहय नाही. सदर प्रकरणातील सुनावणीदरम्यान प्रतिवादी क्र.१ ने वादी क्र.२ यास लगत भू–धारक म्हणून म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही. उपरोक्त उपलब्ध पर्यांयी रस्त्याची महत्वाची बाब प्रतिवादी क्र.२ व ३ मार्फत लपविण्यात आली. त्याबाबत, मंडळ अधिकाऱ्यामार्फत करण्यात आलेला पंचनामा व अहवालाबाबत उल्लेख आहे. तथापि, त्यामध्ये प्रतिवादी क्र.५ नामे तात्यासाहेब हे सदर पर्यायी रस्त्याने

आपल्या जमिनीमधून वादींना पुढे जाऊ देत नाहीत, असे नमूद केले आहे. त्यासंबंधाने, प्रतिवादी क्र.५ आणि प्रतिवादी क्र.६ मार्फत पुरसीस अनुक्रमे नि.क्र.१२८ व १२९ दाखल करुन त्यांचे मालकी व ताब्यातील जमीन गट क्र.१९ व १८ मधून प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांना त्यांच्या मालकीच्या जमीन गट क्र.२० मध्ये येण्याजाण्यास संमती असल्याचे आणि भविष्यात त्यांच्यातर्फे त्याबाबत आक्षेप अथवा उजर राहणार नसल्याचे कळविले आहे. प्रतिवादी क्र.२ हा जवळचा आणि सोयीचा रस्ताच पाहीजे या स्वरुपाची मागणी करुन, हेकेखोरपणा करीत आहे. प्रस्तुत विधीज्ञांनी युक्तीवादा दरम्यान, माझे वादीतर्फे दाखल अर्ज नि.क्र.४८ वरील दि.१०.०१.२०२३ रोजी पारीत आदेशान्वये नियुक्त न्यायालयीन आयुक्ती श्री. एस. सी. शर्मा तर्फे दाखल अहवाल व पुरवणी अहवाल नि.क्र.७४ व ७५ कडे सुद्धा माझे लक्ष वेधले. त्यांचे युक्तीवादाप्रमाणे, सदर संहीतेचे कलम १४३ मधील तरतूदींन्वये प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांचे शेत जमिनीत वहीतीकरिता येण्या जाण्यासाठी पर्यायी व वाजवी रस्ता उपलब्ध असल्याचे, प्रकरणात प्रथम दर्शनी पुरावा उपलब्ध आहे. करिता, प्रस्तुत विधीज्ञांनी अर्ज मंजूर करण्याची मागणी केली.

**०९.** वादींना अर्ज नि.क्र.१३९ वरील आदेशान्वये पुरेशी संधी देऊनही युक्तीवादाच्या पुष्ट्यर्थ संलग्न न्यायनिवाडे दाखल करण्यास, ते असमर्थ ठरले.

**१०.** प्रतिवादी क्र.२ च्या विधीज्ञांनी केलेल्या अधीकच्या युक्तीवादाप्रमाणे, वादांकीत रस्त्याचा आदेश पारीत करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ मार्फत वादी क्र.२ यांना सुद्धा म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली आहे. उपरोक्त न्यायालयीन आयुक्तामार्फत दाखल अहवाल व सोबतचा नकाशा आणि इतर संगल्न कागदोपत्री पुरावा लक्षात घेता, प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या सदर शेतजमिनीमध्ये वहीती करण्यासाठी दिलेल्या बांधावरील वादांकीत रस्त्याशिवाय इतर पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याबाबत वादींतर्फे केलेल्या कथनामध्ये, तथ्य नसल्याचे आढळते. दावा प्रलंबीत कालावधीमध्ये प्रतिवादी क्र.५ व ६ मार्फत

कथीत पर्यायी रस्ता त्यांच्या जमिनीमधून पुढे प्रतिवादीं क्र.२ व ३ यांना त्यांचे जमिनीत जाण्याकरिता वापरण्यास नाहरकत पुरसीस दिल्याच्या केवळ कारणावरुन, वादांकीत रस्त्याचा आदेश अवैध ठरविता येणार नाही. उलट, प्रतिवादी क्र.१ मार्फत सदर संहीतेचे व शासकीय संबंधीत परिपत्रकाचे अवलंब करुन सदर संहीतेचे कलम १४३ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करुन वादांकीत रस्त्याबाबत वैध आदेश पारीत केला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीमध्ये वहीती करण्यास अथवा पिकाची वाहतूक करण्यास येण्या जाण्यासाठी वाजवी रस्ता असणे अत्यंत आवश्यक असते. त्यासंबंधाने, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी **याचिका क्र.२९७४/२०१४ (सुभाष बाबुराव चाकपुरे व इतर विरूद्ध सुरेश शंकरराव रोंगे व इतर) मध्ये दि.३१.०१.२०२२** रोजी पारीत केलेल्या आदेशाकडे प्रस्तुत विधीज्ञांनी माझे लक्ष वेधले. येणेप्रमाणे, प्रस्तुत विधीज्ञांनी अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

**११.** उर्वरीत प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद करण्यास पुरेशी संधी देऊनही, कोणीही हजर राहीले नाही. करिता, प्रस्तुत अर्ज गुणदोषावर निकाली काढण्यास्तव घेण्यात आला.

**१२.** उपरोक्त पक्षकारांच्या कथनावरुन अवलोकनास्तव खालील मुद्दे उपस्थित झाले. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह पुढील प्रमाणे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी पुरावा आहे काय? | **होय....** |
| २. | वादींच्या हक्कात सोयीचा समतोल आहे काय? | **होय....** |
| ३. | मागणी नुसार तात्पुरता मनाई हुकूम मंजूर न केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय? | **होय....** |
| ४. | आदेश कोणते? | **अर्ज मंजूर...** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत :–**

**१३.** प्रस्तुत मुद्दे प्रकरणातील वादाच्या अनुषंगाने एकमेकांशी संलग्न असल्यामुळे अवलोकनास्तव एकत्रीत घेण्यात आले.

**१४.** प्रस्तुत अर्ज, वादपत्र नि.क्र.१ आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ तर्फे दाखल लेखी कैफीयत तथा म्हणणे अनुक्रमे नि.क्र.४१, ४२, ८७ व ७०, प्रतिवादी क्र.५ व ६ तर्फे दाखल संमती पुरसीस अनुक्रमे नि.क्र.१२८ व १२९ चे आणि सोबतच वादींतर्फे दाखल वर्णन यादी नि.क्र.४, ३०, ५१ व १३७, प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वर्णन यादी नि.क्र.१३१ आणि प्रतिवादी क्र.५ तर्फे वर्णन यादी नि.क्र.६९ सोबत दाखल कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. वादींतर्फे प्रस्तुत अर्ज व मूळ दाव्यामधील कथनाच्या पुष्ट्यर्थ वादी क्र.१ नामे मधुकर उत्तमराव धिरडे याचे अनुक्रमे नि.क्र.६ व ७ आणि प्रतिवादी क्र.२ व ५ तर्फे त्यांची कैफीयत अनुक्रमे नि.क्र.४२ व ७० मधील कथनाच्या पुष्ट्यर्थ स्वतःचे पुरावा शपथपत्र नि.क्र.४३ व ७१ वर दाखल केले आहेत.

**१५.** उपरोक्त पक्षकारांचे कथन, उपलब्ध कागदोपत्री पुरावा जसे की, वर्णन यादी नि.क्र.६९/१ सोबत दाखल जमीन गट क्र.१८, १९ व २० चा नकाशा, न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल नि.क्र.७४ आणि केलेला युक्तीवाद लक्षात घेता, सदर परिसरातील पुरुषोत्तमपुरी ते जायकोबाची वाडी दरम्यानच्या सरकारी पूर्व–पश्चिम रस्त्यालगत उत्तर बाजूने असलेल्या वादी क्र.१ च्या जमीन सर्व्हे क्र.१० तथा गट क्र.१७ मधील जमीन आणि वादी क्र.२ च्या जमीन गट क्र.२२ तथा सर्व्हे क्र.१४ मधील जमिनीच्या दरम्यान असलेल्या सामाईक

बांधावरुन प्रचलीत असलेला कथीत सव्वा आठ फुटाचा रस्ता प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या जमीन गट क्र.२० तथा सर्व्हे क्र.११ मध्ये जाण्याकरिता खुला करुन देण्याबाबत प्रतिवादी क्र.१ मार्फत वादांकीत आदेश सदर संहीतेचे कलम १४३ मधील अधिकाराचा वापर करुन पारीत केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

**१६.** उपरोक्त जमिनीच्या नकाशामध्ये, वादींतर्फे नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या सदरहू जमिनीमध्ये वहीतीकरिता जाण्याकरिता पर्यायी रस्ता असल्याचे दर्शविलेले नाही. तथापि, न्यायालयीन आयुक्त यांनी अहवाल नि.क्र.७४ सोबत दाखल नकाशामध्ये उपरोक्त शासकीय रस्त्यावरुन जमीन गट क्र.१५ च्या क्षेत्रामधून पुढे दक्षिणोत्तर सुमारे १० फुटाचा गाडीरस्ता असल्याचे आणि सुमारे १०० मीटर पुढे गेल्यानंतर तो रस्ता पुर्वेकडील गट नंबर १५ व १६ दरम्यानचा बांध ओलांडून पूर्वेकडे वळून प्रतिवादी क्र.६ नामे विश्वांभर यांची जमीन गट क्र.१६ व प्रतिवादी क्र.४ यांची जमीन गट क्र. १८ मध्ये गेल्याचे नमूद केले आहे. सदर अहवालामध्ये आणि सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे, सदरचा गाडी रस्ता केवळ प्रतिवादी क्र.४ च्या जमीन गट क्र.१८ च्या मध्यापर्यंत अस्तीत्वात आहे. या परिस्थीतीत, वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या जमिनीत जाण्यासाठी नमूद १० ते १२ फुटाचा पर्यायी रस्ता मागील ७० ते ८० वर्षापासून अस्तीत्वात असल्याच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून येत नाही. तसेच, प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी या प्रकरणात अनुक्रमे पुरसीस नि.क्र.१२८ व १२९ अन्वये रस्त्यासंबंधाने नाहरकत दिल्याच्या केवळ कारणावरुन उपरोक्त वादांकीत रत्याचा आदेश निरस्त होऊ शकत नाही किंवा तो कायदेशीररित्या ग्राह्य नसल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही.

**१७.** सद्यस्थितीत प्रकरणातील वादाच्या अनुषंगाने उभय पक्षकाराच्या कथनाचे सखोल निरीक्षण करणे आवश्यक नाही. तथापि, वादींतर्फे या अर्जात मागणी केल्यानुसार तात्पुरता मनाई हुकूम मंजूर करण्यास्तव त्याचे हक्कात प्रथम दर्शनी पुरावा व सोयीचा समतोल आहे काय? आणि मागणीनुसार मनाई हुकूम मंजूर न केल्यास, त्यांचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता आहे काय?, हे महत्वाचे तीन घटक सिद्ध केले किंवा कसे याची तपासणी करणे आवश्यक आहे. उपरोक्त विधीज्ञांनी केलेल्या युक्तीवादानुसार, प्रतिवादी क्र.१/तहसीलदार मार्फत सदर संचिकेत पारीत केलेल्या वादांकीत रस्त्याबाबतच्या आदेशाची प्रथम दर्शनी कायदेशीर वैधता तपासण्याकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहीता, १९६६ चे कलम १४३ आणि अनुषंगीक बाब म्हणून मालमतदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ मधील कायदेशीर तरतूदीं लक्षात घेणे क्रमप्राप्त आहे.

**१८.** सदर संहीतेचे कलम १४३(१) अंतर्गत एखाद्या भूमापन क्रमांकात जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस इतर लगत भू–मापन क्रमांकाच्या हद्दीवरुन वहीती करण्यास ये–जा करण्यास्तव रस्त्याबाबतच्या मागणीची चौकशी करण्याचा आणि त्याबाबत निर्णय देण्याबाबत तहसीलदारांना अधिकार दिले आहेत. तथापि, तशा प्रकारच्या प्रकरणात निर्णय करताना संबंधीत शेतकऱ्यास स्वतःच्या शेतात जाण्यासाठी रस्त्याची वाजवी आवश्यकता लक्षात घेणेसुद्धा आवश्यक असते. याचाच अर्थ, सदर कायदेशीर तरतूदींअन्वये शेतजमीनींच्या हद्दीवरुन शेतकऱ्यांना अथवा लगत भू-धारकांना आपल्या जमिनीची वहीती करण्यास ये-जा करण्यास्तव रस्त्यासंबंधाने कायदेशीर हक्क ठरविण्याचा आणि त्या संबंधाने योग्य तो निर्णय पारीत करण्याचा संबंधीत तहसीलदार यांना कायदेशीर अधिकार प्रदान केले आहेत. याउलट, मामलतदार न्यायालयाचे अधिनियमाचे कलम ५ मधील

तरतूदींन्वये, मामलतदार न्यायालयास शेत जमिनीच्या संबंधाने रस्त्याचा किंवा येण्या-जाण्याच्या वहीवाटीचा वापर करीत असलेल्या व्यक्तीला इतर व्यक्तीने कायदेशीर तरतूदींचा अवलंब केल्याशिवाय अडथळा निर्माण केल्यास किंवा त्रास दिल्यास, त्या इसमास तसे करण्यापासून मनाई करण्याचा अथवा केलेला अडथळा काढून टाकण्याबाबत आदेश करण्याचे अधिकार दिले आहेत.

**१९.** मान्यतः, प्रतिवादी क्र.१ यांनी तहसीलदार, माजलगाव म्हणुन सदर संहीतेचे कलम १४३ मधील अधिकाराचा संदर्भ देऊन जमीन सर्व्हे नं.१० तथा गट क्र.१७ चे पूर्व बाजूच्या दक्षिणोत्तर बांधावरुन प्रचलीत असलेला सव्वा आठ फुटाचा रस्ता खुला करुन देण्याचा संदीग्ध आदेश पारीत केला. वास्तविक पाहता, प्रतिवादी क्र.१ यांना मामलतदार न्यायालयाचे पिठासीन अधिकारी म्हणून सदर अधिनियमाचे कलम ५ अंतर्गत शेत जमिनीच्या संबंधाने रस्त्याचा किंवा येण्या-जाण्याच्या वहीवाटीच्या वापरास इतर व्यक्तीने कायदेशीर तरतूदींचा अवलंब केल्याशिवाय अडथळा निर्माण केल्यास किंवा त्रास दिल्यास, त्या इसमास तसे करण्यापासून मनाई करण्याचा अथवा केलेला अडथळा काढून टाकण्याबाबत आदेश करण्याचे अधिकार दिला आहे. वादांकीत आदेशाखाली आदेश पारीत करणार म्हणून संबंधीत तहसीलदाराचे नाव व पदनाम नमूद केले आहे. प्रतिवादी क्र.१ मार्फत सदर आदेशात त्याठिकाणी रस्ता उपलब्ध असताना अर्जदार म्हणजेच प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदर रस्त्यावरुन वहीवाट का करु नये, याबाबत त्याप्रकरणातील गैरअर्जदार तथा वादींतर्फे समर्पक बाजू सादर केली नसल्याचा, निष्कर्ष काढल्याचे दिसून येते. यावरुन, वादांकीत रस्त्याचा आदेश प्रतिवादी क्र.१ मार्फत सदर संहीतेचे कलम १४३ मधील अधिकाराचा समर्पकपणे वापर करुन पारीत केल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येत नाही.

**२०.** प्रतिवादी क्र.२ च्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ तर्फे दि.०२/१२/२०२० रोजी प्रतिवादी क्र.१ यांना दिलेल्या अर्जामध्ये सदर जमिनीत येण्या-जाण्यासाठी उताराच्या पूर्वेकडील बांधावरुन कायमस्वरुपी रस्ता देण्याची मागणी केली होती. सदर अर्जाची छायांकीत प्रत वर्णन यादी नि.क्र.४/३ वर दाखल केली आहे. त्याचप्रमाणे, प्रतिवादी क्र.२ तर्फे दि.०५/०३/२०२१ रोजी त्याचप्रकारचा अर्ज दाखल करुन स्वतःचे जमीन सर्व्हे नं.१० मधून जमीन सर्व्हे नं.११ मध्ये जाण्यासाठी गाडीरस्ता देण्याची मागणी केली होती. सदर दोन्ही अर्जामध्ये अथवा वर नमूद जमिनींच्या नकाशामध्ये वादांकीत आदेशात नमूद केल्यानुसार जमीन सर्व्हे नं.१० तथा गट क्र.१७ चे पूर्व बाजूच्या दक्षिणोत्तर बांधावर प्रचलीत सव्वा आठ फुटाचा रस्ता अस्तीत्वात असल्याचे नमूद अथवा दर्शविले नाही. यावरुन, प्रतिवादी क्र.१ मार्फत प्रचलीत रस्ता खुला करुन देण्याबाबत आणि वादींना त्या प्रकरणातील गैरअर्जदार म्हणून सदर रस्त्याने प्रतिवादी क्र.२ व ३ व इतर शेतकऱ्यांच्या वहीवाटीस अडवणूक करण्यास प्रतिबंधीत करण्याबाबत कायदेशीर तरतूदींच्या विसंगत आदेश पारीत केल्याचे, प्रथमदर्शनी दिसून येते. वर नमूद केल्यानुसार, प्रतिवादी क्र.२ च्या अर्जातील मागणीनुसार सदर जमिनींच्या समाईक बांध अथवा हद्दीवरुन ये–जा करण्यास्तव रस्त्याबाबत प्रतिवादी क्र.१ मार्फत तहसीलदार म्हणून आदेशीत करणे आवश्यक होते. करिता, वादांकीत रस्त्याबाबतचा आदेश कायदेशीररित्या ग्राह्य नसल्याचे, वादींतर्फे प्रथमदर्शनी सिद्ध केले आहे. या परिस्थीतीत, प्रकरणातील उर्वरीत कागदोपत्री पुराव्यास सद्यस्थितीत महत्व प्राप्त होणार नाही.

**२१.** एकंदरीत, प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे स्वरुप व वरील कारणे मिमांसा लक्षात घेता, वादींनी प्रतिवादी क्र.१ मार्फत पारीत रस्त्याबाबतचा

वादांकीत आदेश कायदेशिररित्या ग्राह्य नसल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध केले आहे. त्यामधील परिणामक आदेशात, प्रतिवादी क्र.१ मार्फत सदर आदेशाची प्रत संबंधीत पक्षकार, तलाठी व मंडळ अधिकारी, किट्टी आडगाव यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अर्थात अंमलबजावणी करिता पाठविण्याचे प्रस्तावित केले. या परिस्थीतीत, वादींच्या हक्कात प्रथम दर्शनी पुरावा आणि सोयीचा समतोल असल्याचे आढळून येते. अर्थातच, प्रस्तुत अर्जातील मागणीनुसार तात्पुरता मनाई हुकूम मंजूर न केल्यास, वादीचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट, प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या जमिनींमध्ये वहीतीकरिता ये–जा करण्यास्तव लगत जमिनींच्या समाईक बांधावरुन वाजवी रस्त्याच्या मागणीस्तव प्रतिवादी क्र.१ कडे नव्याने कायदेशीर कार्यवाही करण्याची मुभा उपलब्ध आहे. या परिस्थीतीत, माझ्या मते **सुभाष वि. सुरेश व इतर** (वर नमूद) प्रकरणात सदर संहीताचे कलम १४३ अंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीमध्ये वहीती करण्यास अथवा पिकांची वाहतूक करण्यास येण्या जाण्यासाठी वाजवी रस्ता अत्यंत आवश्यक असल्याबाबत, विषद न्यायतत्वाची सद्यस्थितीत प्रतिवादी क्र.२ यांना मदत होऊ शकत नाही. येणेप्रमाणे, वादींच्या विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद उपरोक्त निष्कर्षानुरुप उपलब्ध पुराव्यानुसार सुसंगत असल्याचे आढळते. तर, प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही. परिणामी, मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–**

**२२.** वरील मुद्दयांच्या निष्कर्षाचा एकत्रीत परिणाम म्हणून, वादींतर्फे त्यांच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम मंजूर करण्यास्तव दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश–३९, नियम– १ व २ अन्वये आवश्यक तीन घटक सिद्ध केले

आहेत. करिता, अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. प्रस्तुत अर्जाचा खर्च अंतीम हुकूमनाम्यावर अवलंबून ठेवणे योग्य होईल. परिणामी, मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.क्र.०५) मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी क्र.१/तहसीलदार यांनी संचिका क्र.२०२१/जमा–२/कावि–१४३ दि.१७/०५/२०२२ अन्वये वादांकीत रस्त्याबाबत पारित केलेल्या आदेशाची प्रस्तुत दावा प्रलंबीत कालावधीमध्ये अंमलबजावणी करु नये, या स्वरुपाचा तात्पुरता मनाई हुकूम दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश–३९, नियम–१ व २ नुसार मंजूर करण्यात येत आहे. |
| ३. | अर्जाचा खर्च अंतीम हुकूमनाम्यावर अवलंबून राहील. |

SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Digitally signed by SAHEBRAO SHESHRAO BUDRUK
Date: 2026.03.18 17:37:25 +0530

(सा. शे. बुद्रूक)

दिनांक १८.०३.२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माजलगाव.

# शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |

सही/–

दिनांक –१८.०३.२०२६

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव